# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०९/२०२६ (गुरूवार )

..........................................................................................

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी राज्यात प्रथम PITNDPS अधिनियमांतर्गत केली स्थानबद्धतेची कारवाई

## अवैध अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत आरोपी अभिनेश बर्मे उर्फ वर्मा याला PITNDPS अधिनियमांतर्गत केले स्थानबध्द

मा. श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर ,मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारास आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत अवैध अंमली पदार्थाच्या गुन्हयातील सराईत आरोपी अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा, वय २७ वर्षे, रा. येरला, ता. जि. नागपूर याच्याविरुद्ध अंमली पदार्थ व मन:प्रभावी पदार्थांच्या अवैध वाहतुकीस प्रतिबंध करणारा अधिनियम, १९८८ **(PREVENTION OF ILLICIT TRAFFIC IN NARCOTIC DRUGS AND PSYCHOTROPIC SUBSTANCES ACT, 1988 ) - PITNDPS Act** च्या कलम ३(१) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**PITNDPS** अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेचा आदेश पारित करण्याचे अधिकार यापूर्वी प्रधान सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे होते. दिनांक ०४/०९/२०२६ रोजी पारीत झालेल्या नवीन शासन निर्णयानुसार सदर अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक यांना प्राप्त झाल्यानंतर, या अधिकाराचा वापर करीत महाराष्ट्र राज्यात प्रथमच नागपूर ग्रामीण पोलिसांनी **PITNDPS** अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. नागपुर ग्रामीण पोलीसांनी नमुद आरोपी विरुद्ध **PITNDPS** १९८८ च्या कलम ३(१) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस

**महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाने सदर प्रस्तावाला मंजुरी देवुन दिनांक ०९/०९/२०२६ रोजी सदर स्थानबद्धता आदेश पारित केला.**

**दिनांक ०३/०४/२०२६ रोजी एमआयडीसी बुटीबोरी पोलीस ठाणे, नागपूर ग्रामीण गु.र.क्र. १२४/२०२६, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम, सहकलम ३/२५ शस्त्र अधिनियम तसेच कलम ३(१) (ii), ३(२), ३(४) मोक्का अधिनियम अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी बुटीबोरी पोलीस स्टेशन हद्दीत कारवाई करून १) अंमली पदार्थ गांजा १.११४ किलोग्रॅम किंमती २०,०००/—रुपये , २) लोखंडी नळी व लाकडी बट असलेली भरमार बंदुक अग्निशस्त्र किंमती ४०,०००/—रुपये, ३) ०१ मोबाईल किंमती २०,०००/— रुपये, ४) हयुंडाई आय २० कार क्रं एम एच ४६ ए पी ७७२६ किंमती ५,००,०००/— रूपये आणि १९,६४०/— रूपये रोख रक्कम असा एकुण ६,०४,६४०/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान नमुद आरोपी नामे अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा, वय २७ वर्षे, रा. येरला, ता. जि. नागपूर याचा सहभाग असुन तो संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख तसेच अंमली पदार्थ पुरवठादार असल्याचे तपासातून निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुद्ध मोक्का (MCOCA )अधिनियमाच्या अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच नमुद आरोपीविरुद्ध यापूर्वी मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये सहा महिन्यांची तडीपारी तसेच एमपीडीए अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली होती.**

**नमुद आरोपी अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा, वय २७ वर्षे, रा. येरला, ता. जि. नागपूर याच्याविरुद्ध सन २०२२ पासून आजपावेतो एनडीपीएस कयादयान्वये एकूण ०६ गुन्हे दाखल आहेत. १) हुडकेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर शहर अपराध क्र. २१२/२०२२, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम. **२) गिट्टीखदान पोलीस ठाणे,** नागपूर शहर अपराध क्र. २२६/२०२४, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम**,३) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्र. ४६८/२०२५, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम**.४) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्र. ४८१/२०२५, कलम ८(सी),

२०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम.**५) कळमेश्वर पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्रं. २२७/२०२६, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम आणि **६)एमआयडीसी बुटीबोरी पोलीस ठाणे,** नागपूर ग्रामीण अपराध क्रं १२४/२०२६, कलम ८(सी), २०(बी)(ii)(सी), २९ एनडीपीएस अधिनियम, सहकलम ३/२५ शस्त्र अधिनियम तसेच कलम ३(१)( ii ), ३(२), ३(४) मोक्का अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल आहे.

**अनेक प्रतिबंधात्मक कारवायांनंतरही आरोपीचा अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारातील सहभाग सुरू तसेच त्याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवल्याचे निदर्शनास आले.आरोपीची सातत्यपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्ती, अंमली पदार्थांच्या अवैध व्यापारातील सहभाग, संघटित गुन्हेगारीशी असलेला संबंध तसेच समाजाच्या सुरक्षिततेस निर्माण होणारा संभाव्य धोका लक्षात घेऊन त्याच्याविरुद्ध PITNDPS अधिनियमांतर्गत स्थानबद्धतेची प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असुन त्याला स्थानबध्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे.**



**अभिनेश उर्फ अभिषेक उर्फ अण्णा देवशंकर बर्मे उर्फ वर्मा**

# पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील मौजा चांपा बेडा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपींवर ४ गुन्हे नोंद, ०४ लाख ४० हजार २५० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १०/०९/२०२६ रोजी पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील चांपा बेडा शिवारात मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पाचगाव पोलीसांनी चांपा बेडा शिवारात अवैध दारू निर्मिती करणाऱ्यांवर कारवाई करत घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**कारवाई क्रं १)** महीला आरोपी हीचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि १०० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ९०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. **कारवाई क्रं २)** महीला आरोपीवर कारवाई करत घटनास्थळावरून १४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि ५० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ४५० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. **कारवाई क्रं ३)** महीला आरोपीवर कारवाई करत घटनास्थळावरून २४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि १५० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले १०५० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. **कारवाई क्रं ४)** आरोपी नामे राहुल वरतास पवार, वय ४० वर्ष, रा. चांपा, त. उमरेड, जि. नागपूर याचेवर कारवाई करत घटनास्थळावरून १००० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि ३५ लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ३०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले.

पोलीसांनी घटनास्थळावरून चारही कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ६२०० लिटर मोहाफुल सडवा, ३३५ लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले २७०० लिटर मोहाफुल रसायन सडवा प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ४,४०,२५०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी १ असे ४ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.






TRAN
PERFORMANCE





# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक १०/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन कन्हान, कळमेश्वर च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्यासह कळमेश्वर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी कळमेश्वर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— श्री शशांत एन. एम, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्यासह कन्हान पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी कन्हान शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**


ADMISSIONS




कन्हान नवरात्र
गरबा महोत्सव समिती
महारासगरबा प्रशिक्षण शिबिर
500/-
SHRI GAS POINT
HP GAS
C. TIWARI & CO.
POLICE




कन्हान नवरात्र
गरबा महोत्सव समिती
महारासगरबा प्रशिक्षण शिबिर
500/-
15 A/c रूम
डॉ. श्याम बापूरकर
SHRI GAS

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ५ लाख ८४ हजार ६०० रूपयांचा मुद्देमाल जप्त अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक १०/०९/२०२६ रोजी अरोली पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा रेवराल शिवार, श्रीनाथ रइसमिल जवळ मोकळ्या जागेत सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे **१) बलदेव प्रेमजी कोठे, वय ५२ वर्ष, २) रमेश रामजी हरकडे, वय ३२ वर्ष, ३) अरूण गाँवीदा बाबरे, वय ३५ वर्ष,४) जितेंद्र श्रीकृष्ण श्रावणकर, वय २६ वर्ष, ५) राजु गोपींचद वहीले, वय ४१ वर्ष ६) गोपाल चिंतामण श्रावणकर, वय ३४ वर्ष,७) सचिन घनश्याम पटीये, वय ३७ वर्ष,८) अविनाश राजेद्र श्रावणकर वय ३० वर्ष,९) रविंद्र रामचंद्र ठोंबरे, वय ४२ वर्ष ,१०) सुनिल फुलचंद मरके, वय ४१ वर्ष सर्व रा. रेवराल ता.मौदा जि.नागपुर** हे जागीच जुगार खेळतांना मिळुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम १४,४००/—रुपये, ६ मोटर सायकल, ९ मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण ५,८४,६००/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ अ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**




## प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची विक्री करणाऱ्या ०२ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल, ०२ आरोपी अटक, ६७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०९/०९/२०२६ रोजी कन्हान पोलीस स्टेशन हद्दीत प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची अवैधरित्या विक्री करणाऱ्यांविरुद्ध कन्हान पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन यांच्यासह संयुक्त कारवाई केली.

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत आरोपी १) **शुभम रामचंद्र सायरे, वय २७ वर्षे, रा. रायनगर, कन्हान आणि २) विवेक गुप्तालाल मेश्राम, वय ३९ वर्षे, रा. इंदिरा नगर, कन्हान** हे त्यांच्या पानठेल्यावर महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या सुगंधित तंबाखूची अवैधरित्या विक्री करीत आहे. अशी गोपनिय माहीती प्राप्त झाली.सदर माहिती प्राप्त होताच कन्हान पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन यांच्यासह संयुक्त कारवाई करत आरोपी शुभम रामचंद्र सायरे याच्या पानठेल्याची झडती घेतली असता त्याच्याकडे महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेला सुगंधित तंबाखू आढळून आला. त्याच्याकडून ५.७५० किलोग्रॅम प्रतिबंधित सुगंधित तंबाखू, किंमत ८,४००/— रुपये तसेच खर्रा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी मशीन, किंमत २५,०००/— रुपये, असा एकूण ३४,४००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला तसेच आरोपी विवेक गुप्तालाल मेश्राम याच्या पानठेल्याची पंचांसमक्ष झडती घेतली असता

त्याच्याकडे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू आढळून आला. त्याच्याकडून ०५ किलोग्रॅम प्रतिबंधित सुगंधित तंबाखू, किंमत ८,०००/— रुपये तसेच खर्रा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी मशीन, किंमत २५,०००/— रुपये, असा एकूण ३३,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दोन्ही कारवायांमध्ये एकूण ६७,४००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

**नमूद आरोपींना प्रतिबंधित सुगंधित तंबाखू मानवी आरोग्यास अपायकारक असल्याची तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उत्पादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध घातलेला असल्याची माहिती असतानाही प्रतिबंधित अन्नपदार्थाची विक्री करताना मिळून आल्याने दोन्ही आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम, २००६ सह कलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहिता अन्वये प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद,
## ०१ लाख १७ हजार ६८० रूपयांचा मुद्देमाल जप्त,
## वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा** :— दिनांक ०९/०९/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने काही इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ कढोली पुलीया येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान १) दुचाकी क्रमांक ड्रिम युगा गाडी क्र. एम एच—४९/डब्लु ५३७८ ही मिळुन आली. तसेच सावळी फाटा येथे २) युनिकॉर्न गाडी क्र एम एच ३५/ए.वाय—५९४७ मिळुन आली. वाहन थांबवुन दोन्ही वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता दोन्ही वाहनात देशी दारू दारूच्या निपा मिळुन आल्या. वाहन क्र. **१) मध्ये आरोपी नामे विजय संतोष बरमैय्या, वय २० वर्षे, रा. छपारा, ता. शिवनी एम.पी, ह.मु. जैस्वाल ढाबा कढोली वाहन क्र. २) मध्ये आरोपी**

आकाश दामोदर गडमळे, वय २७ वर्षे, रा. गारला, ता. कामठी, जि. नागपुर हे अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपी क्र. १) याचे ताब्यातून देशी दारूच्या ९६ निपा किंमती ३८४०/—रूपये, दुचाकी क्रमांक ड्रिम युगा गाडी क्र. एम एच—४९/डब्लु ५३७८ किंमती ४०,०००/—रूपये, आरोपी क्र. २) याचे ताब्यातून देशी दारूच्या ४८ निपा किंमती ३८४०/—रूपये, २) युनिकॉर्न गाडी क्र. एम एच ३५/ए.वाय—५९४७ किंमती ७०,०००/—रूपये दोन्ही वाहनामधील असा एकुण किंमती १,१७,६८०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद दोन्ही आरोपी यांचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.



## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०१ लाख ३ हजार ७६० रूपयांचा मुद्देमाल जप्त, जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— दिनांक ०९/०९/२०२६ रोजी जलालखेडा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने एक इसम अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ कंरजोली शिवार येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान दुचाकी क्रमांक एम एच —४०/डी एम—३२६४ मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू दारूच्या निपा मिळुन आल्या. **आरोपी नामे किशोर रामदास काळबांडे, वय ३५ वर्ष, रा. करंजोडी, ता. नरखेड हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या ४७ निपा किंमती ३७६०/—रूपये २)** दुचाकी क्रमांक एम एच —४०/डी एम—३२६४ किंमती १,००,०००/—रूपये, **असा एकुण किंमती १०३७६०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी किशोर रामदास काळबांडे, वय ३५ वर्ष, रा. करंजोडी, ता. नरखेड याचेविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री, वाहतुक करणाऱ्या, तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २३ गुन्हे नोंद

**दिनांक ०९/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २३ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत ०४** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत** १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत** १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा अंतर्गत ०२** गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बेला अंतर्गत ०४** गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन वडोदा अंतर्गत ०४** गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत ०२** गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण ४८६०० मिली देशी दारू, ३४७ लिटर मोहाफुल दारू, १६७५ लिटर मोहाफुल रसायन सडवा व ईतर साहित्य असा एकुण ३७१०५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपुर ग्रामीण जिल्हा